# प्रेसनोट दिनांक – १२/०८/२०२४

## दि. ११/०८/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ४८६/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०९(१),३०८,११५(१),३५१, ३५२, ३(५), शस्त्र अधिनियम कलम ४(२५) मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),१३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०८/०८/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजणेचे सुमारास बी.आर.टी. बस स्टॅाप समोर पालीकेच्या जागे मधील मच्छी मार्केट मध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी २३.२४ वा |
| फिर्यादी | :- | रेश्मा सिकंदर शेख वय २९, व्यवसाय मासेविक्री, रा.गणराज्यकॉलनीनं २ देवकर वस्ती, चक्रपाणी वसाहत भोसरी पु |
| आरोपी | :- | १) उज्वला अमोल गायकवाड रा.घरकुल चिखली ,२) रसिका गोविंद जगताप रा.भोसरी, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी मच्छी मार्केट येथे असताना नमुद आरोपी यांनी फिर्यादी हिचे दुकानावर येवुन फिर्यादी व साक्षीदार यांना याठिकाणी मासे विक्री करायची असेल, तर यापुर्वी माझा भाऊ कुक्या यास हप्ते देत होते, तो आता जेल मध्ये आहे आता आम्हा दोघींना हप्त्याचे पैसे दयावे लागतील, नाही दिले तर तुम्हाला धंदा करु देणार नाही असे म्हणुन फिर्यादी हिचे सह इतर बायका यांचे कडुन दर महीन्याला प्रत्येकी ७००/- रुपये हप्त्याची मागणी करुन, फिर्यादी हिने पैसे दिले नाहीत म्हणुन गेली १५ ते २० दिवसापासुन धमक्या व शिवीगाळ करुन, दि दि.०८/०८/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता फिर्यादी हिचे दुकानावर येवुन तिला तु दुकान लावणेचे दोन महीन्याचे हप्त्याचे पैसे अजुन पर्यत का दिले नाहीस, तुला जास्त माज आला आहे काय? असे म्हणुन त्यादोघीनी फिर्यादी हिस शिवीगाळ दमदाटी, मारहाण करुन पिडीत हिने त्यांना आडवत असताना, आरोपी क्र १ हिने आम्ही दोघी तुला जिवंत सोडत नाही असे म्हणुन फिर्यादी हिचेवर दोघींनी हल्ला केला व आरोपी क्र २ हिने तिचे हातातील कोयता फिर्यादी हिचे मानेवर मारुन पिडीत हिचा जिव घेणेचा प्रयत्न केला, परंतु तिने मारलेला कोयता फिर्यादी हिने चुकविला. त्यामुळे फिर्यादी हिस कोयता लागला नाही. त्यानंतर फिर्यादी हिने त्यादोघींच्या गेली तिन महीन्या पासुन दिलेल्या त्रासाला कंटाळुन तिचे दुकानावर झुरळ मारण्याचे औषध पिले असुन, ती सध्या वाय.सी.एम हॉस्पीटल येथे ॲडमिट आहे.म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मोहारे ७९७२३३६२७० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ३५७ /२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३५२,३५१(२),३२४(५),३(५),भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), क्रिमीनल लॉ अमेंटमेंट कलम ३,७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ११/०८/२०२४ रोजी ००.३० ते ०१.०० वा.चे दरम्यान पंचक्षील बिल्डींग जवळ ओटोस्कीम निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी २०/३२ वा |
| फिर्यादी | :- | तेजस गणेश कांबळे वय-२४ धंदा-नोकरी रा.पंचक्षील हौसीग सोसायटी बि.नं.६ रुम नं ३०६ आझाद चौक से.नं.२२ ओटास्किम निगडी पुणे |
| आरोपी | :- | १)अमर सिंग राजेद्रसिंग जुन्नी , वय१८ वर्षे , रा. संग्रामनगर झोपपटटी आझादचौक ओटास्किम निगडी पुणे<br>२)जयसिंग जलसिंग जुन्नी , वय १८ वर्षे , रा.पाटील इस्टेट शिवाजीनगर पुणे , **आरोपी अटक आहे**<br>**विधीसंघर्षित बालक -१** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याचा मित्र अकबर शेख असे दोघे बील्डींगचे समोर बोलत थांबलेले असताना काळ्या रंगाचे बुलेट वरुन आलेले आरोपी क्रं १ व २ व एक विधीसंघर्षित बालक यांनी फिर्यादी यांचे जवळ येवून फिर्यादी व त्याचा मित्र अकबर यास शिवीगाळ करुन धमकी दिली. आरोपी क्रं २ याने फिर्यादीचे दोन्ही हात पकडून आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील लोखंडी कोयता फिर्यादीचे उजव्या हातावर उलटा कोयता मारून जबरदस्तीने फिर्यादीचे पॅन्टच्या उजव्या खिशातून १०००/- रू काढून घेवून त्यांचे हातामधील लोखंडी |

कोयता व पालघन हवेमध्ये फिरवुन रस्त्यावर मोठ मोठ्याने आरडा ओरडा करुन शिवीगाळ करुन लोकांना बघुन घेण्याची धमकी देवून संगनमताने दहशत निर्माण करून  वाहनांची तोडफोड करुन अंदाजे २,००,०००/- रुपयाचे नुकसान केले म्हणून

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्रेणी पोउपनि देवरे ७८७५२८७५९८ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ३२३/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४),३०५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/०८/२०२४ रोजी १२.०० ते दि ११/०८/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा चे दरम्यान रा. के/ऑ संभाजी मोरे, पहिला मजला, संकल्प हॉऊस, नाजुका बिल्डिंग च्या पाठीमागे, अभिनव नगर, जुनी सांगवी,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी १९/५८वा |
| फिर्यादी | :- | नारायण वसंत यलाटिकर वय ३३ वर्षे ,धंदा नोकरी, रा. के/ऑ संभाजी मोरे, पहिला मजला, संकल्प हॉऊस, नाजुका बिल्डिंग च्या पाठीमागे, अभिनव नगर, जुनी सांगवी, पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात आरोपी. |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे राहते घराचे कुलुप कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाचे तरी सहाय्याने तोडुन त्या द्वारे घरामध्ये प्रवेश करुन बेडरुममधील लाकडी कपाटातील लॉकरमधील ५३.२१ ग्रॅम वजनाचे २,८०,०००/- रु किंमतीचे सोन्याचे दागिने व २०,०००/- रू किंमतीचे चांदीचे दागीने तसेच १०,०००/- रु किंमतीचा लॅपटॉप व २०,०००/- रोख रक्कम, असे एकुण ३,३०,०००/- रु. किंमतीचा माल हा घरफोडी चोरी करुन नेला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि ताकभाते ९२८४६४९१७८ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ५५८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७/०७/२०२४ रोजी ११/०० वाचे सुमार चाकण एस .टी स्टॅन्ड येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी १३/२९ वा. |
| फिर्यादी | :- | राजेश वासुदेव पदमणे वय २९ वर्षे धंदा- फोटोग्राफर रा. कडाचीवाडी ता.खेड जि. पुणे. |
| आरोपी | :- | इसम नामे शुभम पावर पुर्ण नाव पत्ता माहीत नसुन त्यांने ६३०७१४६५७४ |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मोनं ७७२०८८०७९२ यावरून ओ एल एक्स ॲप वरुन फिर्यादीची पल्सर गाडी नंबर एम एच १४ जे एन ४८५७ ही विकण्याची जाहीरात टाकली होती. दि २४/०७/२०२४ फिर्यादी यांना वॉटसअप नंबर ६३०७१४६५७४ व्दारे संदेश आला मी शुभम पवार बोलतोय की, मला तुमची मोटार सायकल विकत घ्यायची आहे. तुमच्या मोटार सायकलचे फोटो ,आर सी बूक चे फोटो पाठवा त्यांतर फिर्यादी यांनी सदर मोटार सायकलचे फोटो त्यांना पाठवले होते. दि २७/०७/२०२४ रोजी ११/०० वाचे सुमार शुभम पवार हा चाकण एस .टी स्टॅन्ड येथे आला व तेथे येवुन फिर्यादी यांना मोबाईल नंबर ९५६११८००५७ यावरुन कॉल केला व सांगीतले की मी चाकण बस स्टॅन्ड येथे आलो आहे . फिर्यादी व आरोपी असे फिर्यादी यांची मोटार सायकल नंबर एम एच १४ जे एन ४८५७ ही घेवुन आळंदी फाटावरुन आळंदी रोडने घाटाचे मार्गी गेले होते.त्यानंतर शुभम पावर याला फिर्यादी यांची मोटार सायकल चालवुन बघायची होती. फिर्यादी हे रोडच्या कडेला थांबले .शुभम पवार हा मोटार सायकल चालविण्यासाठी म्हणुन आळंदी रोडने गेला फिर्यादी त्या ठिकाणी थांबुन १५ ते २० मिनीट वाट पाहीली तो परत आला नाही. नमुद आरोपी याने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन गाडीची चक्कर मारुन पाहतो असे सांगुन फिर्यादी यांनी त्यांची वरील गाडी त्याचे ताब्यात दिली असता त्यांने फिर्यादी यांची मोटार सायकल घेवुन गेला तो अद्याप परत आला नाही.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोहवा भोसले ९५५२५१८०४५ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ४६२/२०२४ भादवी कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/०७/२०२३ ते डिसेंबर २०२३ या दरम्यान, रुपीनगर, मोरेवस्ती या ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी ११/२८ वाजता. |
| फिर्यादी | :- | श्रीकांत पोपटराव देवकाते वय ४० वर्षे, धंदा नोकरी, राह.गौरी नंदन पार्क, आर.एच.९१, फ्लॅट नंबर ११, शाहुनगर चिंचवड, पुणे |
| आरोपी | :- | १)अमोल सुरेश वाघमारे राह.मोरेवस्ती, चिखली पुणे<br>२)दुर्गेश चंद्रकांत शिंदे रा. शिवाजीवाडी, मोशी, पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ व त्याचा साथीदार आरोपी क्र २ यांनी आपआपसात संगणमत करुन, फिर्यादी व साक्षीदार यांना तुम्हाला कमी किंमतीमध्ये शोरुममधुन नवीन मोटारसायकली घेवुन देतो. असे अमिष दाखवुन तुम्हाला तुम्ही विकत घेणा-या नवीन गाडीवर तुमच्या नावावर १०० टक्के लोन करावे लागेल. त्याचे हप्ते आम्ही भरु. अशी बतावणी करुन सर्वांचे आय.डी.एफ.सी. फर्स्ट बॅंकेमधुन मोटारसायकल लोन करुन देवुन मोटारसायकल लोनचे सर्व हप्ते फिर्यादी व साक्षीदार यांना भरावयास लावुन फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन एकुण १०,५७,१००/- रुपये बॅंक अकाउंटद्वारे घेवुन सदरचे पैसे स्वतःसाठी वापरुन अपहार करुन फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि काकडे ९९७५७७२४६४ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९३०/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,४०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २१/०४/२०२४ रोजी ते दि.२८/०५/२०२४ रोजीच्या दरम्यान, हिंजवडी फेज १, ता- मुळशी,जि-पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी २०.५० वा. |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी,वय- ५४ वर्ष,धंदा-नोकरी, रा- हिंजवडी फेज १, ता- मुळशी,जि-पुणे |
| आरोपी | :- | मो.क्र. ३१६४७१७३३३१ धारक अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी मो.क्र. ३१६४७१७३३३१ वर व्हॉटसअॅप ग्रुप तयार करून त्यावर फिर्यादी यांचा मोक्र. अॅड करून फिर्यादी यांना ट्रेडिंगचे आमिष दाखवून फिर्यादी यांना वेगवेगळया खात्यावर पैसे पाठवण्यास सांगुन फिर्यादी यांची एकुण १२,७७,०००/-रू. ची फसवणूक केलेली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शेळके ९३७१४१९९९९ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९२६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम २८१,१२५ (अ)(ब),३२४ (४) मो.व्ही.कायदा कलम १८४,११९/१७७,१३२(१) (क) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०९/०८/२०२४ रोजी रात्रौ २२/३० वा चे सुमारास द सागा हॉटेल समोर माण रोड हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०८/२०२४ रोजी १०.१३ वा |
| फिर्यादी | :- | सेतानराम देवाराम बिश्नोई वय-२७ वर्षे धंदा-स्विगी रा. ओम प्लाझा ९ टाऊन बार समोर वडजाईनगर माण हिंजवडी ता.मुळशी जि. पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात कार चालक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांची बजाज डिस्कवर गाडी नं. एम.एच. १४ डि.एल. ८१५३ ही घेवुन स्विगीचे पार्सल घेवुन जॉय व्हीला माण येथे पार्सल देण्यासाठी जात असताना द सागा हॉटेल समोर माण रोड येथे आले असता एका अज्ञात चारचाकी गाडी वरील चालकाने त्याच्या ताब्यातील कार वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन, भरधाव वेगाने, हायगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे गाडीस समोरुन डाव्या बाजुने धडक देवुन फिर्यादीचे डोक्यास गंभीर जखमी तसेच डाव्या मांडीला व डाव्या हाताला मार लागुन गाडीचे नुकसान करुन घटनास्थळी न थांबता निघुन गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि धुमाळ ८५३०८६६३३३ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३०७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम- ११८(२), ३५२, ३५१(२) (३) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०७/०८/२०२४ रोजी सकाळी १०/०० वा चे सुमारास नाजिया चिकन दुकान रा.सावतामाळी मंदीर शेजारी माळवाडी पुनावळे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १२/०८/२०२४ रोजी ००:१९ वा |
| फिर्यादी | :- | जितेंद्र सदाशिव शिंदे, वय-४५ वर्षे, धंदा-मजुरी रा.मयुरेश हाईट्स माळवाडी जांबे रोड ,रशिकवाडी |
| आरोपी | :- | नबीलाल शब्बीर सय्यद, वय-३२ वर्षे, धंदा- नाजिया चिकन दुकान रा.सावतामाळी मंदीर शेजारी माळवाडी पुनावळे. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे केस कापुन घरी जाण्यासाठी गाडीस हात करुन लिफ्ट मागत असतांना तेथे समोरील नाझीया चिकन सेंटर येथे नबीलाल हा फिर्यादीची चेष्टा करु लागला व फिर्यादीस म्हणाला की, तुला पाय नाहीत का? तु चालत जा तुझे काय हातपाय मोडले का? असे बोलल्यानंतर फिर्यादी त्याला बोलला की, मी माझे जातो तुला काय करायचे त्याला असे वाटले की, फिर्यादीने त्याला शिवी दिली व त्यांचेमध्ये बाचाबाची सुरु होवुन त्याचा राग त्यास आल्याने त्याने त्याचे दुकानातुन लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या मांडीवर मारहाण करुन त्यांचे डाव्या पायास गंभीर दुखापत करुन फिर्यादींचा पुतन्या अविनाश यास पण जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि टार्फे ७२७६८६४४८४ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९२८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०९,३५२,३५१(२),१२६(२), १८९(१), १८९(४),१९१(२)१९०,११८(१),११८(२) ११५(२),मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९/१७७ प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम कालम ३७(१) १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ११/०८/२०२४ रोजी ११:०० वा. भुजबळ वस्ती, वाकड ब्रिज जवळ, ता- मुळशी,जि- पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०८/२०२४ रोजी १९.१३ वा |
| फिर्यादी | :- | विठ्ठल पांडूरंग भुजबळ,वय- ६४ वर्ष,धंदा- काहीनाही, रा-सर्वे नं. १५९, स्वतःचे घर, वाकड ब्रिजशेजारी, भुज वस्ती, वाकड,ता-मुळशी, जि-पुणे |
| आरोपी | :- | १) अंजनाबाई भुजबळ २) संगिता भुजबळ ३) कुसुम तुकाराम भुजबळ , ४) जयश्री दिलीप भुजबळ ५) प्रतिक्षा महातु भुजबळ, ६) लिला चंद्रकांत भुजबळ, ७) कौस्तुभ भुजबळ, ८) अनंत चंद्रकांत भुजबळ ९) कुशाबा बबन भुजबळ, १०) महातु कुशाबा भुजबळ, सर्व रा- भुजबळ वस्ती, वाकड ब्रिज जवळ, ता- मुळशी,जि- पुणे, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी त्यांचेमध्ये चालू असलेल्या जमिनीच्या वादाच्या कारणावरून व कारचा कट मारला त्या कारणावरून आरोपी क्र १० याने तुमच्या कुटुंबाला आज संपवुनच टाकतो असे बोलून फिर्यादीचा मुलगा महेश याच्या डोक्यात लोखंडी रॉड मारला व त्याला जखमी केले तसेच नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांचा दुसरा मुलगा निलेश याला पकडुन डोळयावर डोक्यावर ठोशाबुक्याने मारहाण केलीतसेचत्याला खाली पाडून लाथेने मारहाण केली तसेच फिर्यादीची सुन गौरी हिला आरोपी क्र १० हा लोखंडी रॉडने मारहाण करत असताना तीने उजवा हात मध्ये घातलात्यामुळे हाताला मार लागुन फ्रॅक्चर झाले आहे.तसेच नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केली आहे, फिर्यादी व फिर्यादीचे कुटुंबाला नमुद आरोपी ईसमांपासून धोका आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि महाले, ८८८८७६३७३० |

१०.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ४५९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ए),३३१(४)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०९/०८/२०२४ रोजी रात्री १०/०० वा ते दि १०/०८/२०२४ रोजी सकाळी ०४/०० वा चे दरम्यान सिटीप्लस मेडीको नावाचे शॉप नंबर ६,रुद्रा रेसीडेन्सी नेवाळेवस्ती चिखली पुणे व साने चौक ते शिवरकर चौक रोड,चिखली येथील शिवशक्ती मार्ट नावाचे दुकानामध्ये

गुन्हा दाखल :- दि ११/०८/२०२४ रोजी०१/३० वा

फिर्यादी :- श्री.गणेश सदाशिव चालखोर,वय-३७ वर्षे धदा-व्यवसाय रा.एश्वर्यम कोर्टयार्ड सोसायटी, बिल्डीग नंबर बी,फ्लॅट १२०३,नेवाळेवस्ती चिखली

आरोपी :- आज्ञात चोरटा

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे सिटी प्लस मेडीको नावाचे शॉप, त्यांचे दुकानाजवळील थोडया अंतरावर असलेले इसम नामे भाउसाहेब तुळशीराम ढवळे यांचे साने चौक ते शिवरकर चौक रोड, चिखली येथे शिवशक्ती मार्ट नावाचे दुकान असुन दि,०९/०८/२०२४ रोजी रात्रौ १०/०० वाजता ते दिनांक १०/०८/२०२४ रोजी सकाळी ०४/०० वाजण्याचे दरम्यान दोन्ही दुकानातील लोखंडी शटर हे मधोमध कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वताच्या अर्थिक फायद्याकरीता कशाचे तरी साहयाने उचकटुन फिर्यादी यांचे शॉपमध्ये प्रवेश करून २५,०००/- रु रोख रक्कम व भाऊसाहेब शिवरकर यांचे दुकानातील १२,०००/- रु असे एकुण रोख रक्कम ३७०००/-रुपये चोरी करून घेवून गेला.म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि बाबर, ९०२८५७५५९६

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ९२९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११०,३५२, ३५१(२), १८९(१),१८९(४),१९१(२) १९० महा.पो.का. कलम ३७(१),१३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ११/०८/२०२४ रोजी ११:०० वा. भुजबळ वस्ती, वाकड, ता- मुळशी,जि- पुणे

गुन्हा दाखल :- दि ११/०८/२०२४ रोजी २०.२३ वा

फिर्यादी :- कौस्तुभ दिलीप भुजबळ,वय-२६ वर्ष,धंदा-शेती,रा-भुजबळ वस्ती, सावता माळी मंदीरा समोर, वाकड,ता-मुळशी,जि-

आरोपी :- १) विठ्ठल भुजबळ, २) दिनेश भुजबळ, ३) अजित भुजबळ, ४) निलेश भुजबळ, ५) संतोष भुजबळ, ६) मंगल भुजबळ, ७) निलेशची बायको, ८) संतोषची बायको, ९) दिनेशची बायको, १०) अजितची बायको सर्व रा- भुजबळ वस्ती, वाकड, ता- मुळशी,जि- पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे घराचे शेजारी राहणारे विठ्ठल भुजबळ हे वाकड ब्रिज येथे मोटारसायकल वरून रॉंग साईटने आले होते, त्यामुळे फिर्यादीस कारचा हॉर्न का वाजवला? याचा राग मनात धरून व जमिनीच्या जुन्या वादातुन व कोर्टात केस कशी लढतोस ते पाहतो असे बोलून फिर्यादीस शिवीगाळ केली, फिर्यादी यांचा भाउ अनंता वाद मिटण्याकरीता तेथे आला होता, तेव्हा त्यालाही निलेश व संतोष यांनी ठोशबुक्याने मारहाण केली, निलेशला रॉड जोरात डोक्यात मारल्यामुळे एखाद्याचा जिव जावू शकतो याची जाणिव असतानाही, त्याने अनंता यांचे डोक्यात मारण्याकरीता रॉड डोक्याकडे टाकला असता अनंताने, तो हाताने पकडला , तसेच नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून, तुझा बाप मेला आहे, तुलाही मारणार, तुला बघून घेतो, असे बोलून दमदाटी केली व लोखंडी रॉड, पाईप व लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि झोल ८२७५३८७४७७